## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. ५ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेच्या वतीने उद्या गुरुवार, दि. ६ डिसेंबर रोजी सुप्रसिध्द नाटककार प्रा.दत्ता भगत यांचे विद्यापीठात व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

महात्मा फुले पुण्यतिथी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात सकाळी १०.३० वाजता प्रा.भगत यांचे व्याख्यान होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील हे राहतील. तर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर व व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.जे.बी.नाईक उपस्थित राहणार आहेत. `डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान` या विषयावर प्रा.दत्ता भगत हे त्यांचे विचार मांडणार आहेत. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव भ.भा.पाटील व विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.अनिल डोंगरे यांनी केले आहे.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. ५ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे होणाऱ्या जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणी दि. ५ डिसेंबर, २०१८ ठेवण्यात आली होती. परंतू सध्या परीक्षेचा कालावधी असल्यामुळे अनेक महाविद्यालयाकडून ऑनलाईन नोंदणीची मुदत वाढवून मिळावी अशी मागणी होत असल्यामुळे कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांनी विद्यार्थी हीत लक्षात घेऊन १५ डिसेंबर, २०१८ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

अविष्कार संशोधन स्पर्धेसाठी सहा विषयनिहाय विभाग करण्यात आले असून पदवी, पदव्युत्तर, पदव्युत्तर पदवी आणि शिक्षक अशा चार गटात स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेसाठी संशोधकास पोस्टर व मॉडेल या दोन्ही प्रकारातील सादरीकरणात भाग घेता येईल. दिनांक १५ डिसेंबर पर्यंत ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची हार्ड कॉपी व प्रत्येक प्रवेशिकेनिहाय नोंदणी शुल्क रूपये २००/- चा धनादेश शनिवार दिनांक १५ डिसेंबर, २०१८ पर्यंत त्या-त्या जिल्ह्याच्या जिल्हा समन्वयक यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. धुळे जिल्हयाची स्पर्धा आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर

आणि नंदूरबार जिल्हयाची स्पर्धा पूज्य साने गुरुजी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा येथे २६ डिसेंबर रोजी होईल. तर जळगाव जिल्हास्तरीय स्पर्धा धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथे आणि विद्यापीठ प्रशाळेसाठी विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात दि. २७ डिसेंबर रोजी होईल.

अधिक माहितीसाठी www.nmu.ac.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच जळगावसाठी समन्वयक डॉ.अनिल सरोदे (मो.नं,९४२०३ ४९२५९), धुळेसाठी श्री.संदीप पाटील (९८८१३९२१८५), नंदूरबारसाठी श्री.सय्यद हसनी (९९७०७३७२७३) तर उमवि प्रशाळा उपसमन्वयक डॉ.उज्ज्वल पाटील (९४२२९२२८६२) यांच्याशी संपर्क साधावा तसेच उमविशी संलग्नित महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी या स्पर्धेत आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा असे आवाहन अविष्कार २०१८ चे समन्वयक प्रा.भूषण चौधरी व सह समन्वयक प्रा.अजय पाटील यांनी केले आहे.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 — दिनांक : 5 डिसेंबर, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी